# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटणच्या बी. डी. कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात

वार्ताहर

पाटण

येथील बी. डी. कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात व सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण होते. डॉ. उदय लोखंडे व ॲड. तेजस्वी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. उदय लोखंडे यांनी 'मानसिक आरोग्य आणि ताणतणाव व्यवस्थापन' यावर मार्गदर्शन केले. संजीव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

ॲड. तेजस्वी पवार यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर हक्क व जबाबदाऱ्या तसेच रॅगिंग हा गंभीर गुन्हा असून त्यामध्ये सहभागी होणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाते, असे सांगितले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. डॉ. हेमलता काटे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एल. जी. गणगे, प्रा. बी. ए. चव्हाण, प्रा. पी. आर. गायकवाड, डॉ. भरत जाधव, प्रा. आर. के. शिर्के, प्रा. डॉ. एस. एस. कुंभार उपस्थित होते.